## निवडक

### क्षुल्लक कारणावरून कोयत्याने वार

**डोंबिवली :** क्षुल्लक कारणावरून एकावर कोयत्याने वार झाल्याची घटना शनिवार, २७ तारखेला रात्री ३ वाजण्याच्या सुमारास आर.एस. जेतवननगर, समता मार्ग, बावडीजवळ मोहने येथील सार्वजनिक बाथरूमजवळ घडली. या प्रकरणी प्रशांत प्रभू धनवे यांच्या फिर्यादीवरून भूषण गायकवाड याच्यावर खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी धनवे हे रात्रीच्या सुमारास बाथरूमसाठी घराच्या समोरील सार्वजनिक बाथरूममध्ये जात असताना भूषण याने पाण्याने भरलेला डब्बा कट मारल्याने पाणी सांडले. धनवे याने याचा जाब विचारल्याने भूषण संतापला. भूषणने कोयत्याने धानवे यांच्या उजव्या पायाच्या पोटरीवर वार केला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक ए. पी. दांडेगावकर तपास करीत आहे.

### ब्ल्यू व्हेल गेमच्या विळख्यात अडकलेल्या मुलाची आत्महत्या

**पुणे :** ब्ल्यू व्हेल गेमच्या व्यसनात अडकलेल्या एका १५ वर्षीय मुलाने रात्री १ वाजता इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून उडी मारून स्वतःचं जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिंपरी चिंचवडच्या किवळे भागात ही घटना घडली आहे. आर्य शिरराव असं या आत्महत्या केलेल्या मुलाचं नाव आहे. आर्य गेल्या सहा महिन्यांपासून ब्ल्यू व्हेल गेमच्या विळख्यात अडकला होता. तो दिवसदिवसभरात आपल्या खोलीत बसून राहायचा. याशिवाय या काळात मृत्यूसंदर्भातील गाणी त्याला आवडू लागली होती. तो मोठ्या आवाजात मृत्यूसंदर्भातील इंग्रजीतील गाणी ऐकत होता. धक्कादायक बाब म्हणजे त्याने इमारतीवरून उडी मारण्यापूर्वी स्वतःच्या मृत्यूचा प्लान आखला होता. त्याने पेन्सिलिने याचे स्केच तयार केले होते. मुलगा सहा महिन्यांपासून ब्लू व्हेल खेळत असावा असा अंदाज आहे. या काळात आर्य फार आक्रमक झाला होता. गेल्या सहा महिन्यांपासून गेमच्या आहारी गेलेला आर्य स्वतःला बेडरूममध्ये तीन-तीन तास कोंडून घेत असे. खोलीत एकटाच बडबड करत असायचा. हा बदल पाहून आई-वडीलही चिंतेत होते.

# प्रशासकीय इमारत उभारणीचा लोकप्रतिनिधींसह प्रशासनालाच विसर

**विजय पाठक/ जळगाव**

सर्व कार्यालये एकाच इमारतीत असावीत जेणे करून खासगी इमारतीत कार्यालये असल्याने त्यांना द्यावे लागणारे भाडे वाचेल या हेतूने जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी असलेल्या जागेत प्रशासकीय इमारत उभारण्याचे चाळीस वर्षापूर्वी ठरवले. प्रशासकीय इमारत टप्पा तीन बांधला गेला; मात्र टप्पा दोन व एक आजपर्यंत झालाच नाही. कारण याची मागणी ही कोणत्याही लोकप्रतिनिधीने अथवा आज पर्यंतच्या पालकमंत्री महाशयांनी केलेली नाही. प्रशासनाला देखील हे दोन टप्पे बांधायचा विसर पडला.

जळगाव शहरात आज अनेक शासकीय कार्यालये आहेत. ही सर्व कार्यालये शहराच्या विविध भागात विखुरलेली आहेत. या कार्यालयात शासकीय कामांसाठी सामान्य नागरिकाला भेटी देण्यासाठी बरीच पायपीट करावी लागते. बहुसंख्य कार्यालये ही खासगी इमारतीत असून, शासनाला या इमारतींचे भाडे द्यावे लागते.

ही रकम काही कोटींच्या घरात जाते. शासनाचा हा भाडयापोटी जाणारा पैसा वाचावा, सामान्य नागरिकांची पायपीट वाचावी, त्याचे काम जलद व्हावे ही सर्व कार्यालये एकाच इमारतीत आणली, तर ते सोईचे होईल. या हेतूने जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी असलेल्या प्रशस्त जागेत प्रशासकीय इमारत उभारण्याचा प्रस्ताव ४० वर्षांपूर्वी झाला. इमारत बांधण्यासाठी येणारा खर्च पाहता तीन टप्प्यात प्रशासकीय इमारत बांधण्याचे ठरले. त्यानुसार टप्पा तीन बांधून पूर्ण झाला. त्यात अनेक कार्यालये आलीत नागरिकांची सोय झाली. मात्र नंतर टप्पा दोन आणि टप्पा एक हे गेल्या तीस वर्षात बांधले गेलेच नाहीत. २०१२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने आपणहून पुढाकार घेत या टप्प्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला गेला; मात्र तो जिल्हाधिकारी कार्यालयात गहाळ झाला.

### बहुसंख्य कार्यालये ही खासगी जागेत

जळगाव मोठ्या प्रमाणावर विस्तारले गेले असून, कार्यालये देखील वाढली आहेत. बहुसंख्य कार्यालये ही खासगी जागेत आहेत. असे असताना, प्रशासकीय इमारतीची गरज मोठ्या प्रमाणावर जाणवत असताना ही इमारत व्हावी, अशी मागणी एकाही लोकप्रतिनिधीने केलेली नाही, अथवा आतापर्यंतच्या एकाही पालक मंत्री महाशयांना करावीशी वाटली नाहीत. रविवारी चाळीसगावला एक प्रशासकीय इमारत उभारण्यात आली त्याचे पालक मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते, गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत उद्घाटन पार पडले. या इमारतीचे कौतुक देखील झाले; मात्र जळगावला प्रशासकीय इमारत नाही, ती व्हावी असे कुणाला देखील वाटले नाही.

# ठाणे जिल्ह्यात ३१ ब्लॅक स्पॉट

**प्रतिनिधी/ठाणे**

ठाणे शहरातून राज्य आणि राष्ट्रीय महामार्ग जात असून, ३१ ठिकाणी धोकादायक वळणे आणि ठिकाणे शोधण्यात आली आहेत. यापैकी सर्वाधिक १८ ठिकाणे एकट्या ठाणे शहरात आहेत. या अपघातप्रवण ठिकाणांवर विविध प्राधिकरणे एकत्रित उपाययोजना करण्याची मोहीम हाती घेणार आहेत.

रस्त्यावरील खड्डे, धोकादायक वळणे आणि भौगोलिक परिस्थिती यांमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात जीवितहानी होत असते. प्रादेशिक परिवहन विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अपघातांना आमंत्रण देणारे ३१ ब्लॅक स्पॉट आढळले आहेत. यामध्ये सर्वाधिक १८ अपघातप्रवण क्षेत्र ठाणे शहरातून जाणाऱ्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर आहेत.

मीरा-भाईंदर पालिका क्षेत्रात पाच तर ग्रामीण भागातही आठ ब्लॅक स्पॉट निश्चित करण्यात आले आहेत. प्रवासासाठी काळ ठरणाऱ्या हे ब्लॅक स्पॉट कमी करण्याच्या हालचालींना आता वेग आला असून, लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत.

ठाण्यातून राष्ट्रीय महामार्ग-३, नाशिक-मुंबई महामार्ग, मुंब्रा बायपास, कल्याण, भिवंडी, डोंबिवलीतून जाणारा आग्रा मार्ग असे प्रमुख महामार्ग ठाणे शहर आणि जिल्ह्यातून जातात; मात्र सध्या या मार्गावरील रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी पावसाळयात पडणारे खड्डे, त्यानंतर झालेली दुरावस्था, साइडपट्टे नसणे, रस्त्यावर काळोख, कुठे धोकादायक वळण तर कुठे चढण अशी अवस्था अनेक ठिकाणी आहे. त्यात या मार्गावरून धावणाऱ्या लहान वाहनांसह महाकाय कंटेनरची समस्या आहे. अनेकवेळा एकमेकांना ओव्हरटेक करण्याच्या नाद, तर कधी वाहनचालकाची अतिघाईमुळे वर्षभर या मार्गावर अपघातांची मालिका सुरूच असते. वारंवार अपघात घडणाऱ्या अशा धोकादायक ठिकाणांचा शोध प्रादेशिक परिवहन विभागाने घेतला असून, ३१ ब्लॅक स्पॉट आढळले आहेत.

### अपघात घडणारी सर्वाधिक ठिकाणे ठाण्यात

सर्वाधिक अपघात घडणारी अशी १८ ठिकाणे सध्या ठाणे शहरात आहेत. गेल्यावर्षी २५ ब्लॅकस्पॉट आढळले होते. त्या तुलनेत यावर्षी केलेल्या उपाययोजनांमुळे ब्लॅकस्पॉटची संख्या कमी झाली आहे. दुसरीकडे मीरा-भाईंदर पालिका क्षेत्रातही पाचा ब्लॅक स्पॉट आढळले आहेत. स्त्यावरील कोणताही ५०० मीटरचा असा भाग जिथे गेल्या तीन वर्षांत किमान पाच अपघात झालेले ठिकाणांचा समावेश ब्लॅक स्पॉटमध्ये होतो. त्यानुसार ग्रामीण भागातील भिवंडी, वासिंद, शहापूर, कसारा या भागातही १२ ठिकाणे हे अपघात प्रवण क्षेत्र असल्याचे समोर आले आहे. या सर्व ब्लॅक स्पॉटवर गेल्या वर्षभरामध्ये अपघातांची संख्या वाढली असल्याची आकडेवारी सांगते. विशेषत: ठाणे शहरातून जाणाऱ्या मार्गावर २०२३ मध्ये एकूण १५८ अपघात घडले असून, त्यात ५२ जणांनी आपला जीव गमावला आहे. २०२२ च्या तुलनेत अपघातांच्या संख्येमध्ये ३६ ने वाढ झाली आहे. पण उपाययोजनांमुळे मृत्यूचे प्रमाण मात्र आठने घटले आहे. त्यामुळे आता असलेले ब्लॅक स्पॉट कमी करून अपघात व मृत्यूचे प्रमाण शून्यवर आणण्याचे आव्हान सर्वच संबंधित प्राधिकरण व वाहतूक, परिवहन विभागासमोर आहे.

### माजिवाडा परिसरातून जाणारा मार्ग मृत्यूचा सापळा

माजिवाडा परिसरातून जाणारा मार्ग मृत्यूचा सापळा ठरत असल्याचे पाहणीत समोर आले आहे. या ठिकाणी गेल्या वर्षी सर्वाधिक ४० अपघात घडले असून १३ जणांचा मृत्यू झाला आहे. २०२२ च्या तुलनेत येथे अपघात संख्या १७ ने वाढली आहे. तर दुसरीकडे मीरा- भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर खिंड, पाली व दिल्लीदरबार हॉटेल, काजुपाडा, हाडकेश, प्लेझेंट पार्क इत्यादी ठिकाणीही अपघातांचे प्रमाण वाढले असल्याची आकडेवारी प्रादेशिक परिवहन विभागाकडून मिळाली आहे.

### 'ही' आहेत ठिकाणे

रेती बंदर, खारीगाव टोलनाका, दिवा गाव, पिंपळास फाटा, रांजनोली नाका, माजिवाडा, कोपरी पूल, कल्याण फाटा, शिळफाटा, तीन हात नाका, ब्रह्मांड सिग्नल, गायमुख, ओवळा सिग्नल, वाघबिळ, घोडबंदर मार्ग हे ठाण्यातील ब्लॅक स्पॉट आहेत.

## छत्रपती संभाजीनगर येथे श्री गुरू आनंद जन्मोत्सव

**छत्रपती संभाजीनगर :** युगपुरुष, युगद्रष्टा आचार्य भगवंत १००८ पू. आनंदऋषी महाराज यांची १२५ वी जयंती २९ जुलै ते ६ ऑगस्ट या कालावधीत वसंतराव नाईक महाविद्यालय आणि अग्रसेन भवन येथे उत्साहात साजरी करण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजन समितीने आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ४ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट या कालावधीत हा महोत्सव चिकलठाणा येथील क्रिस्टल बेलिसिमो येथे आयोजन करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या मैदानावर आनंद अठ्ठाई तपोत्सवाला सुरुवात होणार आहे. ३० जुलै रोजी आनंद अयंबिल आराधना, ३१ जुलै रोजी आनंद सम्यक आराधना, १ ऑगस्ट रोजी आनंद दया आराधना, २ ऑगस्ट रोजी ओम आनंद गुरुवे नमः जाप आणि ३ ऑगस्ट रोजी आनंद एकासन आराधना होतील. यानंतर ४ ऑगस्ट रोजी क्रिस्टल बेलिसिमो येथे अर्हम मंत्रदीक्षा, ५१ लाख नवकार महामंत्र जप आणि पौषध होईल. ५ ऑगस्ट रोजी १२५ वा गुरू आनंद जन्मोत्सव सोहळा आणि २१०० अठ्ठाई प्रत्याख्यान होणार आहे. या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ६ ऑगस्ट रोजी अठ्ठाई तपस्वींचा पारण महामहोत्सव पूर्ण होणार आहे. श्री गुरु आनंद जन्मोत्सवाच्या गौतम प्रसादी लाभार्थी प्रतिभा राजेश कांकरिया, भारती प्रवीण कटारिया, ज्योती विजय कटारिया, कविता महेंद्र बंब, सपना पारस बोथरा हे आहेत. तसेच अठ्ठाई तपस्वींच्या पारण महोत्सवाचे लाभार्थी विमलाराणी प्रकाशचंद बाफना कुटुंबीय आहेत.

छत्रपती संभाजी नगरमध्ये उपाध्याय प्रवर अरहम विजा प्रवीण ऋषी महाराज, तीर्थेश ऋषी महाराज, प्रीतीदर्शन महाराज प्रशमदर्शन महाराज यांचा चातुर्मास चालू आहे. यावेळी चातुर्मासिक धर्म साधनेअंतर्गत सूर्योदयासह प्रार्थना, सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते १० प्रवचन, रविवारी सकाळी ९:०० ते १०:३० प्रवचन होईल. दररोज सूर्यास्ताच्या वेळी प्रतिक्रमणाचे आयोजन करण्यात आले आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व संबंधिताना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, गावमौजे पेल्हार, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील सर्वे नं. ३५२क/प्लॉट क. १६, क्षेत्र २१.३५.३० आर. चौ. मी. व त्या वरील युनीट क. ए-२, सर्वे नं. ३५२क/प्लॉट क. १७, क्षेत्र २०.९५.८८ आर. चौ. मी. व त्या वरील युनीट क. ए-३ (एअए, एअबी, एअसी) ह्या मिळकती मे. विवा होल्डींग तर्फे भागीदार श्री. दिपक हरिश्चंद्र ठाकूर यांचा मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या मिळकती आहेत. सदरची जमिन मिळकत, त्या वरील मंजुर बांधकाम व भविष्यात सदर जमिन मिळकतीवर बांधकामा संबंधी प्राप्त होर्णाया सर्व हक्का सोबत आमच्या अशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकती वावत शिर्षक सत्यापन करावयाचे आहे. तरी ही ह्या मिळकतीत कुणाही इसमांचा दान, वक्षीस, करार, फरोक्त, वापरवहिवाट, कब्जा, भाडेपटट्या व कुळ आदी व अन्य प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची लेखी हरकत कागदपत्रासहित ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांच्या जे. आर. ए. लॉ असोशिएटस् एल. एल. पी, बी/२०२, बी विंग, दुसरा मजला, किणी आर्केड, स्टेला पेट्रोल पंपच्या मागे, बरामपुर, वसई रोड (प.) ता. : वसई . जि. : पालघर, ४०१२०२, या पत्यांवर कळवावी. सदरची लेखी हरकत जर कागदपत्रा सोवत नसेल तर सदर हरकत अमान्य करण्यात येईल व कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येईल.

अॅड. अजय मायकल कोरिया
दिनांक : ३०.०७.२०२४ वकील
जे. आर. ए. लॉ. असोशिएटस एल. एल. पी.
तर्फे पार्टनर

**जाहीर सूचना**
**गहाळ कागदपत्र**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कै. मधुकांता आर. टोपीवाला हे फ्लॅट क्र. ५८ए चे मालक आणि सुर्य किरण सीएचएस, केम्प्स कॉर्नर, पंगाली, मुंबई-४०० ०२६ चे सभासद होते.
माझ्या अशील सौ. शेफाली पी. अंचन उर्फ कु. शेफाली देसाई या कै. रजनीकांत एन. टोपीवाला यांच्या एक कायदेशीर वारस आणि नामनिर्देशक असलेल्या यांनी सोसायटीला प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारीकरीता अर्जासाठी प्रस्तावित आहेत, कारण खालील दोन कागदपत्रे हे शोधुन सापडण्यासारखे नाही किंवा त्याचा ठावठिकाणा माहीत नाही, जे खालीलप्रमाणे-
१. सुर्य किरण सीएचएस द्वारे जारी मुळ शेअर प्रमाणपत्र धारक क्र. १०७३.
२. सुर्य किरण सीएचएस द्वारे जारी लोन स्टॉक बॉंड प्रमाणपत्र धारक क्र. १७३.
माझ्या अशीलांना २१.०४.२०२४ रोजीस स. १०.४५ वा. वरील कागदपत्र शोधुन सापडण्यासारखी नाही हे समजल्यावर कु. शेफाली पी. आंचन यांनी आधीच गावदेवी पोलीस स्टेशन येथे १०.०५.२०२४ रोजीस सायं. ४.५९ वा. वरील कागदपत्राची गहाळ तक्रार दाखल केली आहे आणि पोलीस अधिकाऱ्यांनी दिनांक १०.०५.२०२४ रोजीस गहाळ अहवाल क्र. ५२८४१-२०२४ धारक जारी केला.
जर कोणाकडेही वरील सदर मुळ कागदपत्रे कब्जात असल्यास आणि सदर फ्लॅटशी संबंधित वरील सदर कागदपत्रांच्या आधारावर कोणत्याही हक्कांचा दावा करीत असल्यास त्यांनी याद्वारे सदर ज्ञात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या दाव्यांच्या पूरक कागदपत्रांसह कळविणे आवश्यक आहे आणि त्या कागदपत्रांचा कब्जा खालील पत्त्यावर स्वाधीन करावा.
**वकील ध्रुमिल पी. मेहता**
**अशीलांकरीता वकील**
**वकील मुंबई उच्च न्यायालय,**
पत्ता- कार्यालय एनबीआर २६, तळमजला, राज गार्डन सोसायटी, महाविर नगर, कांदिवली -पश्चिम, मुंबई-४०००६७.
संपर्क- ९००४१८२०६७
दिनांक- ३०-०७-२०२४
ठिकाण- मुंबई

**जाहीर सूचना**

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **अनुभव पार्क को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.** हे त्यांच्या द्वारे मालकीच्या आणि कब्जातील मिळकतीचे (याखालील लिखित परिशिष्टामधील वर्णन) विकासकाच्या नियुक्तीद्वारे पुनर्विकास पार पाडण्याच्या प्रक्रियेत आहेत.
कोणत्याही व्यक्तींना वरीलसदर मिळकतीसाठी किंवा विरूद्ध कोणताही दावा जसे की, विक्री, भाडेपट्टा, गहाण, भेट, धारणाधिकार, प्रभार, विश्वस्त, निर्वाह, सुविधाधिकार किंवा अन्यकाही दावे असल्यास सदर ज्ञात लिखित निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या कार्यालयात या प्रकाशनाच्या तारखेपासून १४(चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, अन्यथा विकास हक्क जे कोणत्याही विकासक (सोसायटीद्वारे ज्यांची नियुक्ती केली जाईल) यांच्या नावामध्ये मंजुर केले जाईल, ते कोणत्याही तशा दाव्यांच्या संदर्भाशिवाय प्रमाणित केले जातील आणि सदर दावे त्यागित असे समजले जातील.
**परिशिष्ट**
मुंबई उपनगर जिल्हाच्या नोंदणीकृत उप-जिल्ह्यामधील सीटीएस क्र. १९५/११२, सव्हें क्र. २४९, हिस्सा क्र. ४(भाग), गाव घाटकोपर, तालुका कुर्ला धारक प्लॉट क्र. ८३, गरोडिया नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०००७७ येथे स्थित अनुभव पार्क अशा ज्ञात त्यावरील उभी रचनेसह जमिन मोजमापित अंदाजे ७१३.७० चौ.मीटर्स (अभिहस्तांकन विलेखाप्रमाणे) चे सर्व ते भाग आणि विभाग.
दिनांक ३० जुलै, २०२४. **जिनिता शाह**
**वकील आणि सॉलिसिटर्स**
**दुकान क्र. ३४, पारेख मार्केट, एमजी रोड, घाटकोपर (पू.), मुंबई-४०००७७.**

**यूनियन बैंक Union Bank of India**
आफ इंडिया
**ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा:** २१, विणा चेंबर्स, मेझझानीन मजला, दलाल स्ट्रीट, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज जवळ, फोर्ट, मुंबई-४०००२३,
**ईमेल:**
**ubin0553352@unionbankofindia.bank**

**शुद्धिपत्रक**

कृपया **२३.०७.२०२४** च्या या वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या ई-एक्युशन सेल नोटिसचा संदर्भ घ्या. ई-लिलावासाठी दिनांक:-**०८.०८.२०२४** कर्जदार/जमीनदार/गहाणदार **प्रफुल एन सत्रा यांच्या खात्यात, मिनाक्सी प्रफुल सत्रा, रुषभ प्रफुल सत्रा**. खालच्या तारखेत कृपया दिनांक **२४.०७.२०२४ ऐवजी २३.०७.२०२४ वाचा**. ई-लिलाव सूचनेतील इतर सर्व तपशील अटी आणि शर्ती तशाच राहतील
**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : ३०.०७.२०२४** **सही/-**
**मुंबई प्राधिकृत अधिकारी,**
**युनियन बँक ऑफ इंडिया**

**प्रत्यक्ष कब्जा सूचना**

**ICICI Bank** शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्र.२०१-बी, २रा मजला, रोड क्र.१, प्लॉट क्र.बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र- ४००६०४.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, कलम १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा कब्जा त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रूल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक | मिळकतीचे वर्णन/ प्रत्यक्ष कब्जाची तारीख | मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रू.) | शाखेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | रमेश पोपटलाल छाडवा/ जयश्री रमेश छाडवा/ लक्ष्मीबेन छाडवा/ (एलबीटीएनई००००४५८३१५६) | फ्लॅट क्र. ७०३, ७वा मजला, नेहाल अपार्टमेंट कबाड टेंभी नाका, सव्हें क्र. २५/२६, टिक्का क्र. १३, ठाणे-४००६०१./ २४ जुलै २४ | ऑगस्ट ०७, २०२१ रु. १४,१६,०७४.००/- | ठाणे |
| २. | रमेश पोपटलाल छाडवा/ जयश्री रमेश छाडवा/ लक्ष्मीबेन छाडवा/ (एलबीटीएनई००००३९८७८२६) | फ्लॅट क्र. ७०३, ७वा मजला, नेहाल अपार्टमेंट, सव्हें क्र. २५/२६, टिक्का क्र.१२, कबाड टेंभी नाका, अवाज रेडिओ समोर, एडुल्जी रोड, चराई, ठाणे, महाराष्ट्र-४००६०१/ २४ जुलै २४ | ऑगस्ट ०७, २०२१ रु. १,६०,७४२.००/- | ठाणे |

वरील नमूद कर्जदार/हमीदारांस याद्वारे ३० दिवसांत रकमेचा भरणा करण्यास सूचना देण्यात येत आहे, अन्यथा गहाण मिळकती सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीं अंतर्गत सदर सूचना प्रकाशनाच्या ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विकण्यात येतील.
दिनांक : जुलै ३०, २०२४ प्रामाणिकपणे अधिकृत स्वाक्षरीकर्ता
स्थळ : मुंबई आयसीआयसीआय बँक लिमिटेड

**इंडियन ओव्हरसीज बँक**
ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच
मेकर टॉवर ई, ५ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५.
दू.- ०२२-२२१७४११७,०२२-२२१७४१११
**शुद्धिपत्र**
दै. नवशक्ति मध्ये २७/०७/२०२४ रोजी पान क्र. १४ वर छापून आलेल्या इंडियन ओव्हरसीज बँकने जारी केलेल्या जंगम/स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी ई-लिलावाकरिता जाहीर सूचनामध्ये परिशिष्टीत मिळकत कोष्टकातील मिळकतीचा तपशील शिर्षकाखाली मिळकतीचे वर्णन कृपया असे वाचावे.
'९५७० चौ.मी. मोजमापित रिषीराज फिलोमेंटस लि.च्या नावातील नोंदणी जिल्हा रायगडमधील आणि हस्तांतरणाचे दुय्यम निबंधक कर्जत, ग्रामपंचायत कुंभिवली, पंचायत समिती खालापूरच्या हद्दीतील कुंभिवली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित'.
**इलावरसन आर.**
**मुख्य व्यवस्थापक**
**(प्राधिकृत अधिकारी)**
**इंडियन ओव्हरसीज बँक**

**बसंत ॲग्रो टेक (इं.) लि.**
**नों. कार्यालय :** प्लॉट क्र. १३/२, कौलखेड, एस. टी. वर्कशॉप जवळ, अकोला-४४४ ००१.
**सीआयएन:** एल२४१२०एमएच१९९०पीएलसी०५८५६०
**३० जून, २०२४ रोजी संपलेली तिमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण**

| तपशिल | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| | ३०.०६.२०२४ | ३०.०६.२०२३ | ३१.०३.२०२४ | ३१.०३.२०२४ |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | १६,५१४.०० | १५,१८९.४७ | १०,०८१.२६ | ४०,६९८.७७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी) | २६५.०८ | २३०.६५ | ७७२.४० | ४९१.८८ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | २६५.०८ | २३०.६५ | ७७२.४० | ४९१.८८ |
| कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) | २२९.२३ | १९९.९९ | ६७३.७९ | ३९५.७२ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | २२९.२३ | १९९.९९ | ६७१.९१ | ३९३.८४ |
| समभाग भांडवल | ९०६.२८ | ९०६.२८ | ९०६.२८ | ९०६.२८ |
| मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दाखवल्या प्रमाणे राखीव (पुनर्मूल्यांकीत राखीव वगळून) | | | | १६५०८.९४ |
| प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु.१/- चे) | | | | |
| मूलभूत | ०.२५ | ०.२२ | ०.७४ | ०.४३ |
| सौम्यिकृत | ०.२५ | ०.२२ | ०.७४ | ०.४३ |

**टीप :**
वरील माहिती म्हणजे सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजसकडे सादर केलेल्या ३० जून, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा एक उतारा आहे. ३० जून, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईटस् www.bseindia.com, तसेच कंपनीची वेबसाईट www.basantagro.com वर उपलब्ध आहे.
**बसंत ॲग्रो टेक (इं.) लि. करीता,**
**दिनांक : २९/०७/२०२४** **शशिकांत भारतीया**
**ठिकाण : मुंबई** **अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**

**बँक ऑफ इंडिया Bank of India BOI**
Relationship beyond banking
**विरार (प.) शाखा:** यशवंत संकल्प, १ला मजला, इस्ट वेस्ट ब्रिज जवळ, जुना विवा कॉलेज रोड, विरार पश्चिम, पालघर ४०१३०३. **फोन:** ०२५० २५०५७१८
ईमेल: Virarwest.MumbaiNorth@bankofindia.co.in
**संदर्भ: व्हिआयआरडब्ल्यू/एडीव्ही/२०२४-२५/** **दिनांक : २४.०७.२०२४**

**कब्जा सूचना**

**ज्याअर्थी,**
निम्नस्वाक्षरीकारांनी **बँक ऑफ इंडिया, विरार पश्चिम शाखेचे प्राधिकृत अधिकारी** म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात **रु. २४,७९,०६४.५५/- (रुपये सव्वीस लाख एकोणऐंशी हजार चौसष्ट आणि पैसे पंचेचाळीस मात्र)** अशी सूचनेत नमुद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार **सौ. झुमा सुभाष हलदार** यांना बोलाविण्यासाठी दिनांक १०.०५.२०२४ रोजीची मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन कर्जदार, हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ आणि ९अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदर मिळकतीसह व्यवहार करु नये आणि सदर मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा **रु. २४,७९,०६४.५५/- (रुपये सव्वीस लाख एकोणऐंशी हजार चौसष्ट आणि पैसे पंचेचाळीस मात्र)** अधिक त्यावरील व्याज या रकमेकरिता **बँक ऑफ इंडिया, विरार पश्चिम शाखेच्या** प्रभाराच्या अधीन राहील.
**स्थावर मिळकतीचे वर्णन**
**सौ. झुमा सुभाष हलदार यांच्या नावे असलेला फ्लॅट क्र. २५, २रा मजला, श्री आशिर्वाद सीएचएसएल, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, जिल्हा पालघर ४०१२०९ समाविष्ट मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग.**
**दिनांक : २४/०७/२०२४** **मुख्य व्यवस्थापक**
**ठिकाण : विरार (पश्चिम), जिल्हा : पालघर.** **प्राधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ इंडिया**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझ्या अशिलांकडुन मिळालेल्या माहीतीनुसार गावमौजे सांडोर, ता. वसई, जि. पालघर येथील भुमापन क्रमांक व उपविभाग -: २९/४/१/